**अपिलेट प्राधिकरण, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन**
**यांच्यासमोरील पुर्ननिरिक्षण अर्ज**

मे.चिंतेश्वर इंडस्ट्रीज लि.,
उगांव,ता.कामठी, वादी
जि. नागपूर.

**विरुध्द**

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
कल्पतरु पॉईट, ३ रा मजला, प्रतिवादी
सायन (पूर्व) मुंबई.

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे.चिंतेश्वर इंडस्ट्रीज लि.,या उद्योगास जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम २५ व हवा प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कलम २१ नुसार उद्योग स्थापन करण्यास परवानगी नाकारण्याबाबत.**

**प्रस्ताव-**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे.चिंतेश्वर इंडस्ट्रीज लि.,या उद्योगाने, जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम २५ व हवा प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कलम २१ अन्वये अनुमती मिळणेसाठी केलेला अर्ज नाकारलेला आहे. त्या विरुध्द कंपनीने अपिलेट प्राधिकरणाकडे अर्ज सादर केला आहे. सदर कंपनी ही जुलै, २०१० पासून बंद असून जुलै, २००६ मध्ये फक्त ३ महिने चालू होती. सदर कंपनीचा कंन्सेट टू एस्टयॉब्लिशचा विस्तारीकरणाचा अर्ज आर.आर.झेड.समितीने अमान्य केला आहे कारण वायु प्रदूषणाची विहीत मानके साध्य होत नाहीत. तर कंन्सेट टू ऑपरेटचा अर्ज अपिलेट प्राधिकरणाकडे आला असता दिनांक १३/२/१०१२ रोजी प्राधिकरणाने यूडीसीटी,मुंबई यांचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले होते. त्यानुसार कंपनीने अहवाल सादर केला आहे. तथापी सदर अर्ज विहीत विवरणपत्रात नसल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत स्पष्ट करण्यात आले.

त्यामुळे कंपनीने विहित प्रपत्रात मंडळाकडे अर्ज सादर करावा व मंडळाने अर्ज प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात त्याची तपासणी करुन त्यावरील स्वयंस्पष्ट अभिप्रायासहीत अपिलेट प्राधिकरणास प्रस्ताव सादर करावा, असा निर्णय झाला.

| | | |
|---|---|---|
| अधिक्षक अभियंता<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,<br>सदस्य, अपिलेट प्राधिकरण | जल अभियंता<br>बृहन्मुंबई,महानगरपालिका मुंबई<br>सदस्य, अपिलेट प्राधिकरण | सचिव<br>पर्यावरण विभाग, मंत्रालय,<br>अध्यक्ष,अपिलेट प्राधिकरण |